N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** बुलढाणा **P.S.(ठाणे):** बुलढाणा शहर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 1038 **Year (वर्ष):** 2023
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**24/12/2023 01:59

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** शनिवार **Date From (दिनांक पासून):** 23/12/2023
**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 23/12/2023
**Time From (वेळेपासून):** 17:23 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:44 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 24/12/2023 **Time (वेळ):** 01:35 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 006
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 24/12/2023 01:35 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** घाड नाका बसस्टाप समोर, बुलडाणा ,बुलडाणा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** अविनाश सिताराम सोळंकी
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1976
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | डिएसडि विष्व,बुलढाणा,बुलढाणा,बुलढाणा शहर,बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | कोलारा,कोलारा,चिखली,चिखली,बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-9823628211

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | डा . श्री. सचिन पांडुरंग वासेकर | | | 1. साई अपार्टमेंट फ्लट क्रमांक , कुरेशी ले आऊट,बुलढाणा, बुलढाणा,बुलढाणा शहर, बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रु दराच्या एकुण 96 नोटा | 48,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

48,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादि अॅन्टी करप्शन ब्युरो,बुलडाणा दिनांक 24.12.2023 अविनाश सिताराम सोळंकी, वय 47 वर्ष, व्यवसाय डॉक्टर (भुलतज्ञ), रा. कोलारा, ता. चिखली, ह.मु. डि.एस.डि. विष्व, बुलढाणा, मो. क्र. 9823628211, 8975803462. मी समक्ष टंकलिखीत फिर्याद देतो की, मी वरील प्रमाणे असुन वर नमुद ठिकाणी कुटूंबासह राहतो व भुलतज्ञ म्हणून खाजगी तसेच शासकिय रुग्णालयामध्ये सेवा देतो. त्यानुसार मला जिल्हा सामान्य रुग्णालय बुलढाणा, जिल्हा स्त्री रुग्णालय बुलढाणा, येथे मा. जिल्हा शल्य चिकीत्सक, जिल्हा सामान्य रुग्णालय बुलढाणा यांचे आदेश क्रमांक जिएआवकुक/आरोग्य/आयपीएचएस/पुर्ननियुक्ती/6973/2023 नुसार आॅगस्ट 2022 ते जुलै 2023 पासून भुलतज्ञ (कॉल बेसीसवर) कंत्राटी पध्दतीने नेमण्यात आलेले आहे. त्यानुसार मी जिल्हा सामान्य रुग्णालय बुलढाणा, व जिल्हा स्त्री रुग्णालय बुलढाणा कॉल बेसीसवर सेवा देतो. मी दिनांक 22.12.2023 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग येथे जावून श्रीमती शितल घोगरे, पोलीस उपअधिक्षक, अॅन्टी करप्षन ब्युरो, बुलढाणा यांचेकडे लेखी तक्रार दिली की, सन 2023 मधील माहे फेब्रुवारी, मार्च, एप्रिल या तीन महिन्यामध्ये मी जिल्हा सामान्य रुग्णालय, बुलढाणा, तसेच जिल्हा स्त्री रुग्णालय बुलढाणा येथे भुलतज्ञ म्हणुन दिलेल्या सेवेचे जिल्हा सामान्य रुग्णालय येथील 4,00,000/- रुपये व स्त्री रुग्णालय बुलढाणा येथील 6,00,000/- रुपये असे एकूण दहा लाख रुपये बिल माहे ऑक्टोबर मध्ये मला प्राप्त झालेले आहे.त्यानुसार माझी माहे फेब्रुवारी, मार्च, एप्रिल या तीन महिन्यामध्ये मी जिल्हा स्त्री रुग्णालय, बुलढाणा, येथे लावण्यात आलेल्या ड्युटीवरुन निघालेल्या बिलाचा मोबदला म्हणून जिल्हा स्त्री रुग्णालय बुलढाणा येथील वैदयकिय अधिक्षक, श्री. सचिन वासेकर हे माझे निघालेल्या एकूण 6,00,000/- रुपये बिलाचे 8% प्रमाणे 48,000/- रुपये लाचेची मागणी करीत असल्याबाबत लेखी तक्रार दिली. त्यावरुन दिनांक 22.12.2023 रोजी आगार व्यवस्थापक, राज्य परीवहन महामंडळ, बुलढाणा यांचे कार्यालयातील दोन शासकीय कर्मचारी पंच म्हणुन उपलब्ध करुन घेवुन श्रीमती घोगरे मॅडम यांनी मला, पंचाना तसेच कार्यवाही पथकातील सदस्यांचा परीचय करुन दिला. त्यानंतर पोलीस उपअधिक्षक, श्रीमती घोगरे मॅडम यांनी मला व पंचाना पडताळणी कार्यवाहीबाबत सुचना देवून व्हाईस रेकॉर्डर बाबत सविस्तर माहिती दिली. त्यांनतर लोकसेवक श्री. वासेकर यांची जिल्हा स्त्री रुग्णालय बुलढाणा येथे जावून भेट घेवून लाच मागणी पडताळणी कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले त्याबाबतचा सविस्तर पडताळणी पुर्व पंचनामा करण्यात आला आहे. त्यानंतर मी दिलेल्या तक्रारीप्रमाणे यातील लोकसेवक श्री. सचिन वासेकर, वैदयकिय अधिक्षक हे माझेकडे लाचमागणी करतात काय? याबाबत लाचमागणी पडताळणी कार्यवाही आयोजित करणे असल्याने पोउपअधि. श्रीमती घोगरे मॅडम यांनी व्हाईस रेकार्डर चालू करुन नापोकॉ लोखंडे यांचे करवी माझे शर्टचे आतून बाहेरुन दिसणार नाही अश्याप्रकारे लटकावून देवून मला व पंच क्र. 1 श्री. देविदास डोईफोडे यांचेसह माझे खाजगी कारने 16.49 वा. जिल्हा सामान्य रुग्णालयाकडे रवाना केले. त्यावेळी मी व पंच क्र 1 श्री डोईफोडे असे आम्ही दोघे माझे खाजगी कारने जिल्हा स्त्री रुग्णालय बुलढाणा येथे जावून लोकसेवक श्री. सचिन वासेकर यांची भेट घेतली असता झालेल्या भेटी दरम्यान मी, लोकसेवक श्री. वासेकर यांना म्हणलो की, कस करायच तुम्ही सांगा आता, त्यावेळी लोकसेवक वासेकर म्हणाले की, मी काय टेन परसेंट म्हटलं पण तुम्ही, जुन्या ज्या टर्म अन कंडीशन व्हत्या , त्या फॉलो करून ठेवायचं तसं. त्यावेळी तक्रारदार म्हणाले की, आता तुम्ही एट (आठ) परसेंट म्हटलं होत न. मग 8 न म्हटलं त 48 हजार होतात, त्यावेळी लोकसेवक वासेकर म्हणाले की, तुमचे बहुतेक 10 झाले होते सर, त्यावेळी तक्रारदार त्यांना म्हणाले की, आपल्याकडंच जास्त ये न, 10 लाख झाले होते, आपले गायनिकचे 6 लाख झालेले ये सर,आणि जिल्हा सामान्य रुग्णालयाचे 4 लाख रुपयांचे आहे ते टोटल आपलं इकडचं बिल झालेलं ये 6 लाख सर. मग 8 न म्हटलं त 48 हजार होतात, 8 परसेंट च्या हिशोबानं करायचे का? त्यावेळी लोकसेवक श्री वासेकर यांनी हो म्हणून होकार देवून मला सन 2023 मधील माझे माहे फेब्रुवारी, मार्च, एप्रिल या महिन्यांच्या जिल्हा स्त्री रुग्णालय बुलढाणा येथे भुलतज्ञ म्हणून दिलेल्या सेवेच्या एकूण 6,00,000/- रुपये बिलाच्या 8 टक्के प्रमाणे 48,000/- रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम थोडया वेळाने स्विकारण्यास समंती दिल्याने मी व पंच

क्र 1 असे लाप्रवि. कार्यालयात परत आलो. त्यावेळी पोउपअधि श्रीमती घोगरे मॅडम यांनी माझेत व लोकसेवक श्री. वासेकर यांचेत लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकून लोकसेवक श्री. वासेकर यांची माझे जिल्हा स्त्री रुग्णालय बुलढाणा येथील निघालेल्या माहे फेब्रुवारी, मार्च, एप्रील/2023 मधील तिन महिन्याचे एकूण 6,00,000/- रुपये बिलाचे 8 टक्के प्रमाणे 48,000/- रुपये लाच मागणी करुन लाच रक्कम दिनांक 22.12.2023 रोजीच स्विकारणार असल्याची खात्री केली. त्यानुसार सदर प्रकरणात सर्वानुमते दिनांक 22.12.2023 रोजी सापळा कार्यवाही आयोजीत करण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर श्रीमती घोगरे मॅडम यांनी माझेकडे लोकसेवक श्री. वासेकर, वैदयकिय अधिक्षक यांनी लाच मागणी केल्याप्रमाणे त्यांना देण्यासाठी 48,000/- रुपये हजर करण्यास सांगीतले असता, मी माझेजवळील 48,000/- रुपये ज्यामध्ये 500/- रुपये दराच्या 96 भारतीय चलनातील नोटा अश्या श्रीमती घोगरे मॅडम यांचेकडे हजर केल्या असता, सदर नोटांचे क्रमांक हे सापळा पथकाचे मदतीने लिहून घेवून त्या नोटांना अॅन्थ्रासिन पावडर लावण्याची प्रक्रिया पुर्ण करुन मला व पंचाना सापळा पुर्व पंचनाम्याप्रमाणे सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर लोकसेवक श्री. वासेकर यांनी लाच रक्कमेची व्यवस्था झाल्यानंतर फोन करुन येण्याबाबत पडताळणी कार्यवाही दरम्यान सांगीतलेले असल्याने श्रीमती घोगरे मॅडम यांचे सुचनेवरुन लोकसेवक श्री. सचिन वासेकर यांना फोन करुन लाच रक्कम घेवून कोठे येवू याबाबत विचारणा केली असता श्री वासेकर हे मला म्हणाले की, मी तुम्हाला फोन करतो असे म्हटल्याने श्री. वासेकर हे जेव्हा फोन करतील त्यावेळी सापळा कार्यवाही आयोजित करण्याचे ठरविण्यात आले. परंतु खुप वेळ जावून सुध्दा श्री. वासेकर यांचा फोन न आल्याने सदर प्रकरणी लोकसेवक श्री वासेकर यांनी मला फोन करुन लाच रक्कम घेवून बोलाविले नंतर पुढील सापळा कार्यवाही आयोजित करण्याचे ठरविण्यात आले. त्याबाबत सविस्तर सापळा पुर्व पंचनामा करण्यात आला आहे. त्यानंतर दिनांक 23.12.2023 रोजी मी बुलढाणा येथील एका खाजगी रुग्णालयात भुलतज्ञ म्हणून सेवा देत असतांना मला लोकसेवक श्री. वासेकर यांचा फोन आला व त्यांनी मला भेटण्यासाठी बोलाविले असता मी त्यांना सांगीतले की, मी एका ऑपरेशनमध्ये व्यस्त असून फ्रि झाल्यानंतर तुम्हाला फोन करतो असे सांगीतले. त्यानंतर माझे दवाखान्यातील काम पुर्ण झाल्यानंतर मी सदर बाब ही पोलीस उपअधिक्षक, श्रीमती घोगरे मॅडम यांना सांगून पुढील सापळा कार्यवाही आयोजित करण्याबाबत विनंती केली. त्यावरुन श्रीमती घोगरे मॅडम यांनी मला लाप्रवि. कार्यालयात बोलावून घेवून कार्यालयात हजर असलेल्या पंचासमक्ष पुन्हा सापळा पुर्व पंचनाम्यातील सुचनाची पुन्हा उजळणी करुन देवून दिनाक 22.12.2023 रोजी अॅन्थ्रासिन पावडर लावलेली लाचेची रक्कम 48,000/- रुपये सापळा पथकातील सदस्याचे मदतीने माझे पॅन्टच्या उजव्या बाजुचे साईड खिश्यामध्ये ठेवून दिली. त्यानंतर श्रीमती घोगरे मॅडम यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी लोकसेवक श्री. वासेकर यंाना लाच रक्कम घेवून कोठे येवू याबाबत फोन करुन विचारणा केली असता त्यांनी मला बुलढाणा येथील चिंचोले चैकात येण्याबाबत सांगीतले. त्याबाबत मी घोगरे मॅडम व सापळा पथक तसेच पंचाना माहिति दिली असता सर्वानुमते बुलढाणा येथील चिंचोले चौकात पुढील सापळा कार्यवाही आयोजित करण्याचे ठरविण्यात आले. त्यानुसार घोगरे मॅडम यांनी व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन नापोकॉ. लोखंडे यांचे करवी माझे गळयात लटकावून दिले. त्यानतर मला व पंच क्र 1 श्री. डोईफोडे यांना माझे खाजगी मोटार सायकलने चिंचोले चौकाकडे 17.23 वा.रवाना केले. त्यावेळी आमचे मागोमाग घोगरे मॅडम तसेच सापळा पथक व पंच क्र.2 सौ. सोनुने असे शासकिय वाहनाने चिंचोले चौकाकडे रवाना झाले. त्यानंतर घोगरे मॅडम व सापळा पथक असे शासकिय वाहनातुन उतरुन चिंचोले चौकाचे आजुबाजुला आपआपले अस्तित्व लपवुन उभे राहीले. त्यावेळी मी व पंच क्र. 1 श्री. डोईफोडे असे चिंचोले चौकात पोहचल्यानंतर मी लोकसेवक श्री. वासेकर यांना फोन लावून चिंचोले चौकात आलो असल्याबाबत माहिती दिली असता लोकसेवक श्री वासेकर हे मला म्हणाले की, आलोच असे सांगीतल्याने मी व पंच क्र 1 श्री. डोईफोडे असे आम्ही चिंचोले चौकात थांबून राहिलो. त्यानंतर थोडयाच वेळात लोकसेवक श्री. वासेकर हे त्यांचे खाजगी कारने चिंचोले चौकात हजर आले. त्यावेळी मी त्यांना सरजी काही चाय वगैरे बाबत विचारले असता, लोकसेवक श्री वासेकर म्हणाले की, समोर घ्यायचा, धाड नाक्यावर चांगला भेटतो असे म्हणून आम्हाला त्यांचे महिंद्रा KUV-100 कार क्रमांक एम एच 32 वाय 4516 मध्ये बसण्याबाबत इशारा केल्याने आम्ही कार मध्ये बसलो त्यावेळी वासेकर साहेब यांनी कार सुरु करुन कार धाड नाक्याकडे घेवू लागले असता आमचे पाठोपाठ सापळा पथक सुध्दा शासकिय वाहनाने आमचे कार मागे येवू लागले त्यावेळी लोकसेवक वासेकर यांचेत व माझेत हाॅस्पीटलच्या कामासंबधाने बोलणी झाली, त्यानंतर लोकसेवक वासेकर यांनी त्यांची कार धाड नाक्याचे बसस्टाॅप समोर थांबवून मला म्हणाले की, आणले का सोबत? ठेवून दया इथे (पैसे कारचे डॅशबोर्डचे युटीलिटी बॉक्स मध्ये ठेवण्याबाबत इशारा केला), त्यावेळी मी माझे पॅन्टच्या उजव्या बाजुचे साईड खिश्यातुन लाचेची रक्कम 48,000/- रुपये काढून कारच्या डॅशबोर्डचे युटीलिटी बॉक्स मध्ये ठेवण्याअगोदर त्यांना हावो म्हणुन मोजुन घ्या न सर, आपल जे ठरल होत, त्यानुसार जे आहे ते, त्यावेळी लोकसेवक वासेकर यांनी कारचे डॅशबोर्डचे युटीलिटी बॉक्स मध्ये

ठेवण्याबाबत पुन्हा इशारा करुन , ठेवून दया न, असे सांगीतल्याने, मी त्यांना म्हणालो की, आठ परसेंटच्या हिशोबान हे सहा लाखाचे अठठेचाळीस हजार आपले गायनीक हॉस्पीटलच्या हिशोबान, असे म्हणून सदरची लाच रक्कम 48000 /- रुपये त्यांनी सांगीतलेप्रमाणे कारचे डॅशबोर्डचे युटीलिटी बॉक्स लाच रक्कम ठेवून दिली. त्यावेळी लोकसेवक श्री वासेकर, हे हं म्हणाले त्यांनतर आम्ही दोघे जवळच असलेल्या एका चहाचे हॉटेलमध्ये जावून चहा घेतला व त्यानंतर मी माझे डोक्यावरील चष्मा काढुन शर्टाला लटकादून लाच रक्कम स्विकारल्याबाबत नियोजित इशारा करताच पोउपअधि. श्रीमती घोगरे मॅडम व सापळा पथकातील सदस्य असे आमचे जवळ आले व त्यांनी लोकसेवक श्री. सचिन वासेकर यांना माझेकडून लाच रक्कम स्विकारले प्रकरणी ताब्यात घेवून सदर लाच रक्कम ही लोकसेवक श्री सचिन वासेकर यांचे वर नमुद कारच्या डॅश बोर्डच्या युटीलिटी बॉक्समघुन जप्त करण्यात आली आहे श्री. वासेकर साहेब यांना त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव डॉ. श्री. सचिन पांडुरंग वासेकर, वय 42 वर्ष, पद वैदयकीय अधिक्षक, वर्ग 1 जिल्हा स्त्री रुग्णालय बुलढाणा, रा. साई अपार्टमेंट फ्लॅट क्रमांक 15, कुरेशी ले आऊट, ता. जि. बुलढाणा असे सांगीतले. त्यानंतर झालेल्या कार्यवाहीचा सविस्तर सापळा पंचनामा करण्यात आला आहे. तरी लोकसेवक डॉ. श्री. सचिन पांडुरंग वासेकर, वय 42 वर्ष, पद वैदयकीय अधिक्षक, वर्ग 1 जिल्हा स्त्री रुग्णालय बुलढाणा, रा. साई अपार्टमेंट फ्लॅट क्रमांक 15, कुरेशी ले आऊट, ता. जि. बुलढाणा यांनी दिनांक 22.12.2023 रोजी पडताळणी कार्यवाही दरम्यान सन 2023 मधील माहे फेब्रुवारी, मार्च, एप्रिल या तिन महिन्यामध्ये माझी जिल्हा स्त्री रुग्णालय, बुलढाणा, येथे लावण्यात आलेल्या डयुटीवरुन निघालेल्या एकूण 6,00,000/- रुपये बिलाचा मोबदला म्हणून 8 टक्के प्रमाणे

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

PRALHAD KISANRAO KATKAR(I (Inspector)) / BOBN50094

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** **or (किंवा)**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14 **Signature/Thumb Impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Kolanli

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

24/11/2023
ठाणे अमलदार

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** PRALHAD KISANRAO
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** POBN50094